# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन

## अहवाल.

### ध्वजारोहण.

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये ७९ व्या भारतीय स्वतंत्रदिनाच्या निमित्ताने सकाळी ठीक ८:०० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन केले.

### देशभक्तीपर समूहगीत गायन.

महाविद्यालयातील सरस्वती कक्षामध्ये मराठी व हिंदी देशभक्तीपर समूह गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.. या कार्यक्रमात महाविद्यालयातील बी.एड व्दितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांच्या आंतरवसिता गटाच्या वतीने प्रत्येकी एक देशभक्तीपर गीताचे समूहगायन केले.

### महाविद्यालयाच्या छात्रपरिषदेच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा.

महाविद्यालयाच्या छात्रपरिषदेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर आधारित राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली तसेच यामध्ये महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांनी देखील यात सहभाग नोंदविला.

### विभाजन – विभीषिका स्मृती दिन

महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त विभाजन –एक विभिषिका स्मृतिदिन आयोजित करण्यात आला. यामध्ये नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) यांच्याव्दारे व्हिडिओ नाटिकेचे सादरीकरण केले गेले. याचे आयोजन प्रा. बिजली दडपे यांनी केले तसेच अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी भूषवले.

# १५ ऑगस्ट २०२५ स्वातंत्र्यदिन क्षणचित्रे.
















